# ठाणे परिसर



फोटो सर्कलच्या कार्यालयाचे उद्‌घाटन करतांना जेष्ठ छायाचित्रकार उध्दव ठाकरे. सोबत महापौर शारदा राऊत, संस्थेचे अध्यक्ष नयन तांबोटकर, उपाध्यक्ष मनोज मुसळे, प्रविण देशपांडे, नगरसेवक अनिल सावे व महिला आघाडी प्रमुख विमल मोरे आदी.

## फोटोसर्कल सोसायटीच्या कार्यालयाचे उध्दव ठाकरे यांच्या हस्ते उद्‌घाटन

ठाणे (श.प्र.)- दादोजी कोंडदेव स्टेडियममधील फोटोसर्कल सोसायटीच्या कार्यालयाचे उद्‌घाटन ज्येष्ठ वन्य छायाचित्रकार व शिवसेना कार्याध्यक्ष उध्दव ठाकरे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

या संस्थेतर्फे अनेक कार्यशाळा, स्पर्धा चर्चासत्रे, व्याख्याने आदी कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले आहेत. ध्वनिचित्रणाची प्राथमिक माहिती तसेच प्रिंटींग तंत्रज्ञानाची ओळख या संदर्भातील व्याख्यानांचे आयोजन छायाचित्र प्रदर्शन आदी उपक्रम ही संस्थेने अनेक वर्ष यशस्वीपणे राबविले आहेत. ठाण्याचा बदललेला चेहरामोहरा या संस्थेने दिनदर्शिकेच्या रुपाने नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर केले होते.

या कार्यक्रमाप्रसंगी खासदार सतीश प्रधान, महापौर शारदा राऊत महिला आघाडीप्रमुख विमल मोरे, नगरसेविका ॲड. माधवी नाईक, अनिल सावे, राजेंद्र साप्ते, ठाणे भारत सहकारीचे एम.वाय. गोखले, मधु गडकरी, चित्रकार विजयराज बोधनकर ठाणे जिल्ह्यातील अनेक छायाचित्रकार याप्रसंगी उपस्थित होते.